


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७११ . वा | शनिवार | दि. १६ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# विकासपुरुष ही प्रतिमा कधी प्रतापराव तयारच करू शकले नाहीत...

## जिल्ह्यातील एका मोठ्या समुहाचा रोष कसा थोपवणार प्रतापराव ?

**भाग-6**

**जनसंचलन/बुलढाणा**

खासदार प्रतापराव जाधव हे सध्या विविध ठिकाणी देत असलेल्या आपल्या वक्तव्यामध्ये सातत्याने विकासाचा उल्लेख करीत आहेत. सोबतच ते आपल्या विकासाच्या संकल्पनेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही प्रतिमा व त्यांच्या विकासाच्या योजना जोडण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत. परंतु १५ वर्षे खासदार राहून सुद्धा प्रतापराव जाधव कधीही आपली विकास पुरुष ही प्रतिमा कधी तयार करू शकले नाहीत. त्यामुळे जिल्ह्यात आज जनतेच्या एका मोठ्या जनसमुहाचा रोष प्रतापरावांवर दिसून येतो. नेमकी हीच बाब प्रतापरावांच्या उमेदवारीवर सखोल घाव करणारी ठरेल का, असा भला मोठा प्रश्न जिल्ह्यात निर्माण झाला आहे. १९९५ साली प्रतापराव जाधव हे सर्वांत आधी आमदार झाले. १९६० ला राज्य बनल्यानंतर कधी नव्हे ते काँग्रेस व काँग्रेसचे विविध गट वगळता एका नव्या पक्षांचे सरकार सत्तेत आले होते. त्या वेळी प्रतापराव हेही नवखे होते आणि भाजप-शिवसेना युतीला सत्तेत परत यायचे होते, त्यामुळे त्यांनी मोठा जोर लावून राज्यभर विकासकामांचा धडाका लावला होता. त्यामुळे सुरवातीच्या काळात नाही म्हणायला प्रतापरावांच्या मतदारसंघात विकास झाला होता. परंतु त्यानंतर पुन्हा १९९९ साली झालेल्या निवडणुकीत युतीची सत्ता गेली. राज्यात सत्ता गेली असली तरी मतदारसंघात मात्र जनतेने पुन्हा प्रतापरावांना निवडून दिले होते. मात्र, त्यानंतर प्रतापरावांना म्हणावी तशी विकासाची छाप आपल्या मतदारसंघात पाडता आली नाही. तोच किस्सा पुढेही कायम राहिला. त्यानंतर २००९ साली प्रतापरावांना शिवसेनेने खासदारकीसाठी उभे केले. शिवसेना - भाजप युती असल्या कारणाने आणि भाजपने प्रामाणिकपणे काम केल्याने प्रतापराव पहिल्यांदा खासदार झाले. आमदार ते खासदार की पर्यंतचा प्रवास प्रतापरावांनी पूर्ण केला असला, तरी विधानसभा मतदारसंघातील प्रतापरावांचा विकासाचा बोजवारा हा लोकसभा मतदारसंघातही पुढे कायम राहिला. आज प्रतापराव १५ वर्षांपासून खासदार आहेत, परंतु जिल्ह्यात त्यांच्या प्रयत्नांनी झालेले विकासाचे असे कोणतेही ठळक काम नाही. नाही म्हणायला प्रतापरावांचा मीडिया विभाग हा सातत्याने काही ना काही बातम्या प्रसिद्धी माध्यमांना देऊन आपण केलेल्या विकासकार्याचे तुणतुणे वाजवत राहतात. मात्र, त्याचा जनतेवर म्हणावा तसा इम्पॅक्ट पडताना दिसत नाही. कारण जिल्ह्यात आज अनेक समस्या या आ वासून उभ्या आहेत. त्या समस्या सोडवण्यासाठी प्रतापरावांनी कधीही रस दाखवल्याचे दिसून येत नाही. जिल्ह्यात सर्वांत मोठी समस्या आहे ती बेरोजगारीची. जिल्ह्यात उद्योग-धंदे नसल्याने मजुरांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. पर्यायाने शेतीमध्ये काम करायला मजूर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचेही हाल होतात. दुसरीकडे सिंचनाची सुविधा जास्त नसल्याने शेतीही म्हणावी तशी पिकत नाही. जिल्ह्यात नाही म्हणायला खडकपूर्णा, पेनटाकळी, नळगंगा व वान अशी मोठी धरणे आहेत. परंतु तरीही जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेती ही कोरडवाहूच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या आहेत. बुलढाणा जिल्ह्यात एक-दोन तालुके सोडल्यास मोठे व्यापार-उदीम होत नाही. कारण महामार्ग असो किंवा लोहमार्ग यांची कनेक्टिव्हिटी म्हणावी तशी नाही. गेल्या १५ वर्षांपासून खामगाव-जालना रेल्वे मार्गासाठी प्रतापराव काहीही भरीव काम करू शकलेले नाहीत. याशिवाय इतरही अनेक समस्या जिल्ह्यात कायमच आहेत. विकासाचे कितीही दावे प्रतापराव जाधव करीत असले, तरी वस्तुस्थिती मात्र त्याहून वेगळी आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यात प्रतापराव जाधव यांच्याविषयी प्रचंड नाराजीचा सूर आहे. हाच नाराजीचा सूर




शिवसेनेचा मित्रपक्ष असलेल्या भाजप मध्ये ही आहे. त्यामुळेच सध्या भाजपचे कार्यकर्ते देखील बुलढाणा मतदारसंघ आपल्याकडे खेचून घेण्यासाठी प्रचंड जोर लावत आहेत. तीन-तीन टर्म एकाच व्यक्तीचे काम करायचे, त्या व्यक्तीने निवडून आल्यानंतर आपल्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करायचे, हे कुठवर सहन करायचे, असा प्रश्न भाजपचेच कार्यकर्ते विचारू लागले आहेत. प्रतापराव यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते की, भाजपच्या कार्यकर्त्यांना पक्षाचा आदेश सर्वोपरी असतो. तसेच भाजपचे मतदार देखील कधीच दुसरीकडे जात नाहीत. हा प्रकार म्हणजे कार्यकर्ते व मतदारांना गृहित धरण्यासारखा आहे. निवडणुकीत खरेतर कोणालाही गृहित धरणे चुकीचे असते. त्यामुळे ती चूक प्रतापराव करीत आहेत. एकंदर परिस्थितीत प्रतापराव जाधव यांना ही निवडणूक आगामी काळात नक्कीच जड जाणार आहे, यात काहीही शंका नाही.

# बुलडाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने गाळमुक्त धरण,गाळयुक्त शिवार ,जलयुक्त शिवार कार्यक्रम संपन्न









**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा शहरा पासून अवघ्या १२ किलो मीटर असलेले डोंगरखंडाळा येथे जिल्हा प्रशासन आणि बुलडाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार , जलयुक्त शिवार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी कर्तव्यदक्ष बुलडाणा जिल्हाधिकारी मा.किरण पाटील, जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मा. विशाल नरवाडे, बुलडाणा अर्बन सर्वेसर्वा राधेश्याम चांडक (उर्फ भाईजी) तसेच या कार्यक्रमाला मान्यवरांची उपस्थित होती.

# रविकांत तुपकरांच्या झोटींगा येथील निर्धार परिवर्तन मेळाव्याला तुफान प्रतिसाद...

## जिल्ह्यात आता परिवर्तन अटळ : रविकांत तुपकर

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील झोटीगा या गावांमध्ये रविकांत तुपकर यांना भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे जिथे जावे तिथे नागरिकांचा ओसंडून वाहणारा प्रतिसाद मला दररोज लढण्याची नवी ऊर्जा देत आहे, हा उत्साह, वाढता प्रतिसाद आणि प्रेम पाहून अशी खात्री पटली आहे की, ही लोकसभेची निवडणूक माझी एकट्याची नसून ती खऱ्या अर्थाने लोकांची निवडणूक बनली आहे. आता गावोगावी वातावरण पेटले असून नागरिकांनीच आता ही निवडणूक हाती घेतली आहे, त्यामुळे आता जिल्ह्यात परिवर्तन अटळ आहे, असा विश्वास रविकांत तुपकरांनी झोटींगा येथील निर्धार मेळाव्यात बोलतांना व्यक्त केला. रविकांत तुपकर यांची निर्धार परिवर्तन यात्रा १३ मार्च रोजी सिंदखेडराजा तालुक्यात होती. यावेळी झोटींगा येथे झालेल्या रविकांत तुपकरांच्या निर्धार परिवर्तन मेळाव्याला परिसरातील गावकऱ्यांचा तुफान प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी हजारोंच्या संख्येने या मेळाव्याला मोठी गर्दी केली होती. तुपकरांचे गावात आगमन होताच डिजे लावून आणि जेसीबीने पुष्पवृष्टी करून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर गावकऱ्यांनी संपूर्ण गावातून रविकांत तुपकरांची जंगी मिरवणूक काढली. या सर्वांचे हे प्रेम आणि





ओसंडून वाहणारा उत्साह पाहून भारावून गेल्याची भावना तुपकरांनी यावेळी व्यक्त केली. त्याचबरोबर,अंढेरा येथील निर्धार मेळाव्यालाही गावकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. मला सत्तेची आणि पदाची लालसा मुळीच नाही, परंतु कष्टकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा, सर्वसामान्यांचा आवाजही सभागृहात पोहोचला पाहिजे. यासाठी शेतकरी, कष्टकरी व तरुणांच्या आग्रहास्तव आपण ही निवडणूक लढवित आहोत. त्यानंतर आता परिवर्तन निर्धार यात्रेनिमित्ताने गावागावात मिळणारा तुफान प्रतिसाद पाहता मला अशी खात्री पटली की, लोकसभेची निवडणूक माझी एकट्याची नसून ती खऱ्या अर्थाने लोकांची निवडणूक बनली आहे. आता गावोगावी वातावरण पेटले असून नागरिकांनीच आता ही निवडणूक हाती घेतली आहे, त्यामुळे परिवर्तन अटळ आहे, अशा भावना यावेळी रविकांत तुपकरांनी व्यक्त केल्या. सोयाबीन-कापसाला भाव मिळावा, पिकविमा,अतिवृष्टीची नुकसान भरपाई यासाठी विविध आंदोलने केली. गेल्या वर्षी आत्मदहनाच्या आंदोलनावेळी सांगण्यावरून पोलिसांनी लाठीमार केला आणि आम्हाला तुरुंगात टाकले. त्यावेळी झालेल्या वेदना आणि जखमा आता जनतेच्या प्रेमाने भरून निघाल्या आहेत. गेल्या २२ वर्षात मी शेतकरी, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य जनतेसाठी रस्त्यावरची लढाई लढली आहे. या २२ वर्षात मी सत्ता, पैसे, पद जरी कमावले नसले तरी गावगाड्यातील जनतेचा विश्वास, प्रेम आणि आशीर्वाद कमावले. जिवाभावाची लाखो माणसे कमावली, आणि हीच माझी खरी संपत्ती आहे या संपत्तीच्या जोरावरच मी लोकसभेची निवडणूक लढत आहे, गावोगावी मिळणारा प्रचंड प्रतिसाद, सर्वसामान्यांचे प्रेम आणि आशीर्वाद पाहता आता ही लढाई केवळ माझी एकट्याची उरली नाही तर जनतेने ही लढाई आता हाती घेतली आहे, त्यामुळे आता जिल्ह्यात परिवर्तन अटळ आहे, असा विश्वास रविकांत तुपकरांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. झोटिंगा येथील नागरिकांची गर्दी व उत्साह हा लोकसभेच्या निकालाची चुणूक दाखविणारा ठरला.

# जिल्ह्यातील पर्यटनस्थळी शैक्षणिक सहली काढाव्यात

## जिल्हाधिकारी यांचे शैक्षणिक संस्थांना निर्देश...



**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यात वैविध्यपूर्ण पर्यटन स्थळे आहेत. शालेय सहलीच्या माध्यमातून ही पर्यटन स्थळे सर्वसामान्य नागरिकांना परिचित होण्यास मदत होणार आहे. तसेच या सहली पर्यटन वाढीस मदत करणाऱ्या ठरणार असल्याने सर्व शैक्षणिक संस्थांनी जिल्ह्यातील पर्यटनस्थळी प्राधान्याने सहली आयोजित कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहेत. जिल्ह्यात जागतिकस्तरावरील खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर, राजमाता माँ जिजाऊ यांचे जन्मस्थान सिंदखेड राजा. ज्ञानगंगा अभयारण्यात पलढग, माटरगाव बोट, जंगल सफारी, अंबाबरवा अभयारण्य जंगल सफारी, सातपुडा पर्वत, वारी हनुमान मंदिर, १०५ फुट उंच हनुमान मुर्ती असलेले नांदूरा, संत श्री गजानन महाराज मंदिर शेगाव आणि नागझरी, हिवरा आश्रम येथील विवेकानंद गार्डन व बोट सफारी, तसेच बुलडाणा शहरातील बालाजी मंदिर येथील अम्युझमेंट पार्क व श्री स्वयं प्रकाशबाबा गिरडा येथील ध्यान मंदिर आदी प्रेक्षणीय स्थळे आहेत. जिल्ह्यातील या स्थळांची सांस्कृतिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक व पर्यावरण आदीबाबत व्यापक प्रमाणात माहिती व जनजागृती होणे शक्य आहे. तसेच सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत होणार आहे. पर्यटन विकासासाठी जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचे टूरिझम सर्किट तयार करुन सर्व शाळा, महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचा भाग म्हणून याठिकाणी सहलीचे आयोजन करणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापकांनी जिल्ह्यातील प्रेक्षणीय पर्यटनस्थळी विद्यार्थ्यांसाठी सहली आयोजित कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.


बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)


# लोकसभा निवडणुकीसाठी अ. जा.मोर्चा ने जोमाने कामाला लागावे:-सर्जेराव जाधव

**जनसंचलन/ नांदुरा**

बुलढाणा जिल्हा अ. जा. मोर्चाची बैठक नांदुरा येथे संपन्न झाली आहे चंद्रशेखरजी बावनकुळे प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखाली आगामी लोकसभा निवडणुका होत असून या निवडणुकीला अनुसूचित जाती मोर्चाच्या सर्व पदाधिकाऱ्याने ताकतीने कामाला लागून सामोरे जावे भरगच्च मताने आपला उमेदवार लोकसभेमध्ये पाठवा मोदी साहेबांचे हात बळकट करण्यासाठी व आपके बाद ४००पार हे ध्येय गाठण्यासाठी सर्जेराव दादा जाधव(महामंत्री, अ. जा. मोर्चा भा ज. पा. महाराष्ट्र) यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. येत्या लोकसभा निवडणुकीत भा. ज. पा. सोबत राहुन नरेंद्रजी मोदी भाई यांचे हात बळकट करावेत. भा.ज.पा. सरकारने अ जा. साठी बऱ्याच योजना अंमलात आणल्या आहेत. त्या अनुषंगाने मागासवर्गीय समाज हा नरेंद्रजी मोदी यांचे सोबत खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीसाठी अ. जा.मोर्चा ने जोमाने कामाला लागावे असे आवाहन सर्जेराव जाधव यांनी केले.याप्रसंगी बुलढाणा जिल्हा अ. जा. मोर्चा



नवनियुक्त पदाधिकारी यांचे नियुक्ती पत्र दिले.याप्रसंगी भा. ज. पा. चे बुलढाणा जिल्हाध्यक्ष सचिनजी देशमुख, मोहन शर्मा, यश संचेती,ॲड. डिगांबर अंभोरे (प्रदेश सचिव, अ. जा. मोर्चा महाराष्ट्र), ॲड. दिलिप यंगड (प्रदेश सचिव, अ. जा. मोर्चा महाराष्ट्र), सुनिल तांदळे(जिल्हाध्यक्ष, अ. जा. मोर्चा) प्रा. किरण गुडेकर, संजय नांदवे,विजय पालेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यात पर्यटन विकासासाठी प्रयत्न करणार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## उद्योग केंद्रात मैत्री कक्षाचे उद्घाटन...

जनसंचलन/बुलडाणा

जिल्ह्यात विविधांगी पर्यटनस्थळे आहेत. याठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. पर्यटन ठिकाणी योग्य सुविधा मिळाल्यास जिल्ह्यात पर्यटन उद्योगास चालना मिळणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. आज जिल्हा उद्योग केंद्रातील मैत्री कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्योजक राधेश्याम चांडक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुनील पाटील उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, जिल्ह्यात लोणार, सिंदखेड राजा, ज्ञानगंगा, आंबाबरवा यासारखी पर्यटन स्थळे आहेत. मात्र याचा विकास झालेला नसल्याने याठिकाणी पर्यटकांचा ओढा दिसून येत नाही. याठिकाणी चांगल्या दर्जाच्या सुविधा निर्माण झाल्यास पर्यटक या ठिकाणांकडे आकर्षित होतील. शेगाव येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे. त्यांच्यासाठी आंबाबरवा आणि ज्ञानगंगा



ही एका दिवसाची सहल आयोजित करणे शक्य आहे. लोणार हे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ आहे. याठिकाणी संशोधनासाठी येणाऱ्यांना योग्य सुविधा निर्माण होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. सिंदखेड राजा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. यातील विकासकामांसाठी २६० कोटी मंजूर करण्यात आला आहे. याठिकाणी वीजेची कामे करण्यासाठी १ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहे. तसेच जिजाऊसृष्टी येथे अत्यावश्यक सुविधांसाठी ५० कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. लोणारसाठी ३७० कोटी मंजूर करण्यात आले आहे. लोणार सरोवराला वैज्ञानिक दृष्टीकोनातून महत्व असल्याने यातून उत्कृष्ट पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील. प्रामुख्याने लोणार येथे संशोधनासाठी आवश्यक सोयी उपलब्ध करण्यात येतील. जिल्ह्यातील औद्योगिक परिसराच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येतील. खामगाव येथे १७० हेक्टर, मोताळा,, देऊळगाव येथे नव्याने जागा एमआयडीसीसाठी घेण्यात येणार आहे. उद्योजकांनी येणाऱ्या अडचणी एकत्रितरित्या सादर कराव्यात. यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनाही सूचवाव्यात. उद्योजकांना व्यासपीठ मिळावे, यासाठी चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केली.

# १९ मार्चला विभागीय रोजगार मेळावा; अतांत्रिक पदांसाठी टीसीएसमध्ये भरती

जनसंचलन /बुलढाणा

कौशल्य, विकास रोजगार व उद्योजकता विभाग व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळाव्याचे आयोजन मंगळवार दि. १९ मार्च रोजी डॉ. के. जी देशमुख सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे करण्यात आले आहे. या मेळाव्यामध्ये सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी टाटा कन्सलटन्सी सव्हिसेस या नामांकित कंपनीत अतांत्रिक पदांसाठी भरती होत असून या संधीचा इच्छुक व पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालयाचे उपायुक्त द. ल ठाकरे यांनी केले आहे. टीसीएसफमधील अतांत्रिक पदांसाठी बीए, बीकॉम, बीसीए, बीएफए, बीबीआय, बीबीएम, बी. एस्सी. (कृषी शाखेतील पदवी वगळता) आदी शैक्षणिक पात्रता असणा-यांना अर्ज करता येईल. २०२२,२०२३ आणि २०२४ या वर्षात पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार सहभाग घेण्यास पात्र आहेत. सहभाग नोंदविण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

पात्र उमेदवारांनी नियोजित वेळेत प्रत्यक्ष उपस्थित राहावे. सोबत मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती असाव्यात. टीसीएसच्या ऑनलाईन अर्जाची प्रत, पासपोर्ट फोटो, ओळखपत्र (आधार कार्ड,पॅनकार्ड, वाहन परवाना, पारपत्र, मतदान ओळखपत्र यापैकी), १० वी आणि १२ वी चे गुणपत्रिका व प्रमाणपत्र, पदवीच्या वर्ष व सत्रनिहाय गुणपत्रिका व प्रमाणपत्र, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र,अभ्यासक्रम संकलन प्रमाणपत्र असावे. निवड प्रक्रिया लेखी परीक्षा आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येईल. रोजगार मेळाव्याच्या अधिक माहितीसाठी उमेदवारांनी ८९८३४१९७९९, ७२१८३३१७३५, ८६०५६५४०२५, ८६६८२५६५००, ७०२०७५८७०१ व ७९७२६३२८२८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र, अमरावती या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# माजी.आमदार श्री धृपतरावजी सावळे यांच्या वाढदिवसानिमित्य भव्य रक्तदान शिबिर संपन्न...

जनसंचलन/बुलढाणा

द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक व पणन महासंघाचे संचालक, लोकनेते मा. श्री.धृपतरावजी सावळे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे सामाजिक ऋण फेडण्यासाठी म्हणून याही वर्षी सुद्धा १५ मार्च २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग बुलढाणा व श्री.संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. द्वारका फाऊंडेशनच्या सह सचिव सौ. कीर्तिताई पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सदर रक्तदान शिबीर मोठ्या उत्सहात संपन्न झाले. रक्त संकलन करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथून डॉ. श्री हेमंत बिलावेकर, श्री.विनोद झागरे व टीम तसेच लीलावती ब्लड बँकेचे डॉ.अजित शिरसाट व टीम रक्त संकलन करण्यासाठी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या सचिव एँड.सौ.कीर्तीताई पऱ्हाड यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. समीर पऱ्हाड साहेब लीलावती ब्लड बँकेचे डॉ.अजित शिरसाट,जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तपेढीचे अधिकारी डॉ.हेमंत बिलावेकर आणि श्री.विनोद झगरे, प्राचार्य.गौरव हरलालका, प्रा.भानुदास नरवाडे आणि प्रा.प्रवीण राणे उपस्थित होते, डॉ.अजित शिरसाठ यांनी आपल्या मार्गदर्शनात रक्तदान हे श्रेष्ठ दान असून रक्तदान केल्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाजविण्याचे कार्य हे रक्तदान करणाऱ्या रक्त दात्याच्या माध्यमातून होत असते असे सांगितले. तसेच रक्तदान कोण्ही करावे व का करावे याबद्दल माहिती दिली. सदर शिबिरामध्ये राजर्षी शाहू कॉलेज



ऑफ इंजीनियरिंग बुलढाणा व श्री.संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी बुलढाणा येथील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदानामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला व १०३ रक्त बॅगचे रक्त संकलन करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदशन रा.से.यो.कार्यक्रम अधिकार प्रा. प्रमोद काटकर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकार प्रा. प्रमोद काटकर, प्रा.पवन जगताप सर्व विद्यार्थी ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीनें आदिवासी आश्रम शाळेत खावु वाटप

जनसंचलन/खामगाव

गरीबांची जान असणारे स्थानिक सतिफैल भागातील देविदास ऊर्फ मुन्नाभाऊ शर्मा यांनी श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळाची स्थापना केली व मागिल २४ वर्षा पासून मंडळाच्या माध्यमातून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम निस्वार्थ पणे मुख मे हो राम नाम राम सेवा हाथ मे हे ध्येय घेऊन ज्या लोकांच्या डोक्यावर छत नाही अंगावर पुरेसे कपडे नाही खायला दोन वेळ चे अन्नधान्य नाही अशा समाजातील उपेक्षित लोका प्रति आपले ही काही देन लागते हा उद्देश समोर ठेऊन अखंड पणे उपक्रम राबत आहे आज दिं १३-३-२०२४ मंगळवार रोजी श्री कृष्ण कृपा बहु. फासेपारधी समाज विकास संस्था अंतर्गत समशेर सिंग पारधी आदिवासी आश्रम शाळा वरदडा येथे सन २०२३- २४ वर्षी पासून वर्ग १ ते ४ करीता फासेपारधी मुलां- मुलींसाठी सुरू करण्यात आलेली आहे या शाळेत एकुण ८१ विद्यार्थी असुन त्याचे राहण्या खाण्याची शिक्षणाची सोय अत्यंत कमकुवत असताना सुद्धा युवराज पवार हे स्वतः च्या खर्चाने करत आहे त्यांचे हे कार्य पाहून फुल न फुलाची पाकळी श्री सदगुरू एकनाथ महाराज भजनी मंडळ यांच्या वतीने जयराम जी खर्चे, शेषराव अंभोरे,गुलाबराव तुपकर,देविदास



शर्मा,युवराज पवार यांच्या हस्ते बिस्किट चे पुडे खावु सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले तसेच श्री सदगुरू एकनाथ महाराज संस्थान रानमाळा जिल्हा धुळे व शेषराव जी अंभोरे साहेब यांच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली या प्रसंगी श्री सदगुरू एकनाथ महाराज संस्थान रानमाळा चे अध्यक्ष जयराम जी खर्चे, सेवानिवृत्त पि एस आय शेषरावजी अंभोरे साहेब,गुलाबराव तुपकर,भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष देविदास शर्मा. विनोद सुकाळे. दिलीप झापर्डे.आदिवासी आश्रम शाळेचे संस्थापक अध्यक्ष युवराज पवार, सचिन रत्ना पवार, उपाध्यक्ष प्रमिला पवार, इंद्रराज पवार, शिक्षक विद्यमान पवार, रिनेश पवार, जिनेश पवार, धर्मराज पवार, व परिसरातील नागरिक व भजनी मंडळ चे सदस्य हजर होते अशी माहिती श्री सदगुरु एकनाथ महाराज भजनी मंडळाच्या वतीने देण्यात आली

# शॉर्टसर्किटमुळे शेतीपायपाचे हजारो रुपयांचे नुकसान मलगी येथील घटना

जनसंचलन / चिखली



चिखली तालुक्यातील मौजे मलगी येथील विलास प्रकाश पवार यांच्या गट नंबर ९ मध्ये शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी ट्रांसफार्मर बसवलेला आहे परंतु १४ /०३/ २०२४ रोजी एक ते दीड च्या दरम्यान लाईन सुरू असताना ट्रान्सफॉर्मर मध्ये शॉर्टसर्किट होऊन सदर ठिकाणी आग लागली त्यामध्ये स्पिंकलरच्या पाईप सेट हा पूर्ण जळून खाक झाला आहे तसेच इतर साहित्य सुद्धा शॉर्टसर्किटमुळे जळून खाक झाले आहे त्यामुळे सदर डीपीच्या शॉर्टसर्किटमुळे माझ्या पाईप व इतर समान यांचे नुकसान झाले आहे त्यामुळे माझ्या नुकसानीची भरपाई महाराष्ट्र विद्युत कंपनी यांनी भरपाई करून देण्याची मागणी मुलगी येथील विलास प्रकाश पवार यांनी मेरा खुर्द येथील कनिष्ठ अभियंता यांच्याकडे एका अर्जाद्वारे केली आहे

# भाजपचा ४८ पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नाही

## मनोज जरांगेचं फडणवीसांसह भाजपला आव्हान

वृत्तसंस्था/बीड



पुन्हा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्यावर जहरी टीका केली आहे. बीडमधील वडवणी येथील सभेमध्ये बोलताना त्यांनी भाजपला आव्हान दिलं आहे. आगामी निवडणुकीमध्ये भाजपचा ४८ पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नाही, असा धमकीवजा इशाराज मनोज जरांगे यांनी भाजपसह देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे. मी वडवणी मधूनजाहीर आव्हान करतो, तुम्ही मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला तर यांचे ४८ पैकी एकही खासदार निवडून येऊ देत नाही. फडवणीस तुला सांगतो तुझा खासदार आणि आमदार राज्यात निवडून येऊ देणार नाही. दुसरे कुणीही निवडून द्या परंतु यांचा कोणीही निवडणून येऊ द्यायचा नाही, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडवणीस यांच्यासारखा आणि खुन-शी मंत्री मी पाहिला नाही. त्यांच्याकडून बोलणारे सात ते आठ आहेत. सत्ता येत असते जात असते, नका त्रास देऊ. माझी चौकशी सुरू आहे. तुमच्यावर गुन्हे दाखल होत आहेत तर होऊद्या. मी सागर बंगल्यावर जाऊन दहा लाख घेऊन जातो. मराठ्यांनी व्यसनापासून लांब रहा, आपली प्रगती कोणीही रोकू शकत नाही. जामनेरचे टंबरेल गिरीश महाजन म्हणतो माझे खूप लाड केले अरे तूच आमचा चहा पेला आणि पोहे खाल्ले, असं मनोज जरांगे म्हणाले.एकट्या फडवणीसने समाजवेठीस धरला आहे. पण तुझी गाठ माझ्याशी आहे. ६ कोटी मराठा तुडवून माझ्याकडे यावे लागेल. माझ्या बद्दलचे काही व्हिडीओ तयार करायचे आणि मला बदनाम करायचे. असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. हे व्हिडीओ एडिट केलेले असतात. तुम्हाला जे करायचे ते करा, मला जे करायचे ते मी करेल. पण तुमच्या मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण मिळवेल. फडवणीस यांनी कितीही बदनाम केले समाजापासून हटत पण मी घाबरून तुमच्या बाजूने मेलो तरी येणार नाही. फडवणीस यांची काय नीच वृत्ती आहे, गरीब इमानदार पोरग लढत आहे, तुम्ही पाठ थोपटायला पाहिजे, असंही जरांगे यांनी म्हटलं

# मलकापूर तालुक्यातील तो पटवारी वादग्रस्तच

जनसंचलन /मलकापूर

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर भाग एकचे पटवारी धीरज जाधव यांच्याकडून शेतकऱ्यांची चांगलीच हेडसांड होत असून नाहक त्रास शेतकऱ्यांना भोगाव लागत आहे, आधीच अस्मानी सुल-तानी संकटाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीशिवाय पर्याय उर-लेला नसताना वेळोवेळी मलकापूर भाग एकचे पटवारी धीरज जाधव यांच्या कार्यालयात शेतकरी भर उन्हातानात पायपीट करत आहे मात्र कित्येकदा पटवारी महोदय हजर नसल्याने तसेच शेतकऱ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन न मिळू शकल्याने हा हवालदिल झालेला शेतकरी शासनाच्या योजनेचे मदतीप-ासून काहीसा वंचित राहिल्याचे बोलले जात आहे. आपले हितसंबंध जोपासून आपल्या हितासाठी शहरातील काही धनादांडग्यांचे काम त्या ठिकाणी तात्काळ केले जातात मात्र हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांकडे या अधिकाऱ्याचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर मागील काही दिवसांआधी शहरातील एका इसमाला एका भयंकर आजाराने ग्रासले होते त्याला उपचार घेण्यासाठी अकोला येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते मात्र घरची हलाखीची परिस्थिती असताना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता आवश्यक त्या कागदपत्रांचे पूर्तता करावी लागते याकरिता त्या इसमाचे नातेवाईक हे मलकापूर भाग एकचे पटवारी धीरज जाधव यांच्या कार्यालयात आवश्यक असलेल्या कागदपत्रांचे पूर्तता करण्याकरिता आले असता त्यांना उडवा उडवीचे उत्तरे देण्यात आली. मात्र उपचार हा तातडीने घ्यावा लागत असल्याने तसेच या इसमाची घरची परिस्थिती हालाकीची असल्याने शेवटी नाईलंजास्तव लोक वर्गणीतून या इसमाचा इलाज करावा लागला..

# देशाला हेवा वाटावा असा बुलडाणा जिल्हा घडवू : संदीप शेळके



जनसंचलन/मेहकर

आजघडीला बुलडाणा जिल्ह्याची ओळख मागास जिल्हा आहे ही खेदाची बाब आहे. मात्र येणाऱ्या काळात बुलडाणा जिल्ह्यात रोजगार निर्मिती, पर्यटनस्थळांचा विकास, शेतकऱ्यांसाठी पांदनरस्ते, जिल्ह्यात रेल्वे, शेगावला विमानतळ या गोष्टी आपल्या अजेंड्यावर राह-तील. जनतेने आपल्याला लोकसभेत पाठवले तर राज्यालाच नव्हे तर दे-शाला हेवा वाटावा असा बुलडाणा जिल्हा घडवून दाखवतो, असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्प संदीप शेळके यांनी केली. वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा आज १५ मार्चला मेहकर तालुक्यातील कल्याणा येथे पोहचली, यावेळी झालेल्या कॉर्नर सभेत ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आजही इथल्या तरुणाला पंधरा वीस हजाराच्या नोकरी साठी मुंबई, पुणे यासारख्या ठिकाणी जावं लागत. प्रत्येक तालुक्याचे ठिकाणी एमआयडीसी तयार झाली असती तर इथल्या तरुणांना मोठा रोजगार मिळाला असता. त्यामुळे रोजगारासाठी कायम आपले प्रयत्न राहणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना सुरू करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी कायम चिंतेत असताना आपण पाहिलं. मात्र या ठिकाणी संत्रा प्रकिया उद्योग, केळी प्रक्रिया उद्योग शासनाने उभारला असता तर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची क्रांती झाली असती. सिंचनाचा मोठा यक्ष प्रश्न आहे. ७६ वर्षाच्या काळापासून जिल्ह्यात सिंचन प्रकल्प प्रलंबित आहे. अशी सगळी कारणे असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी कायम अडचणीत सापडतो. मात्र आता हे सहन केल्या जाणार नाही, सर्वांगीण विकासातून जिल्ह्यात नवी क्रांती घडवून आणण्यासाठी वन बुलढाणा मिशन ही राजकीय चळवळ पुढे आली आहे. जन-तेने संधी दिली, तर दिल्ली दरबारी जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आपण झगडणार आणि शेतकऱ्यांचा विकास करणार अशी भूमिका संदीप शेळके यांनी व्यक्त केली.

# जागेच्या वादातून केली मारहाण...

जनसंचलन / खामगाव



येथील कॉटन मार्केटमध्ये पाच दिवसांपूर्वी झालेल्या मारहाण प्रकरणी दोघांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, भीमराव नारायण बशिरे (४०) रा. अटाळी हे ९ मार्च रोजी येथील कॉटन मार्केटमध्ये हरभरा विकण्यासाठी गेले होते. याव-ेळी बाळू मोरे (४७) व शुभम मोरे (२८) या दोघांनी बसण्यावरून वाद घालून बशिरे यांना धारदार शस्त्राने मारहाण करुन जखमी केले. या तक्रारीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध भादंवि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958